मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 22 एप्रिल 2025 | पान- 1

# महापालिकेचे भोसरीमध्ये उद्योग सुविधा ‘हेल्प डेस्क’

## आयुक्त शेखर सिंह यांची माहिती : मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड अँग्रीकल्चरचा पुढाकार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्थापित करण्यात आलेल्या ‘उद्योग सुविधा कक्षाचे’ हेल्प डेस्क भोसरी येथील मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड अँग्रीकल्चर (MCCIA) कार्यालयातून लवकरच कार्यान्वित होणार आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थानिक उद्योजकांशी संवाद साधताना ही माहिती दिली.

महानगरपालिकेच्या ‘उद्योग सुविधा कक्षा’ची संकल्पना व कार्यपद्धती याबाबत चर्चेसाठी ‘एमसीसीआयए’ ने पुढाकार घेऊन आयोजित केलेल्या कार्यक्रमास एमसीसीआयएचे माजी अध्यक्ष दिपक करंदीकर, संचालक सुधनवा कोपर्डेकर, महापालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उद्योग सुविधा कक्षाचे संचालक विजय वावरे तसेच अनेक स्थानिक उद्योजक उपस्थित होते.

राज्य सरकारच्या ‘१०० दिवसांचा कृती आराखडा’ उपक्रमांतर्गत ‘गुंतवणूक प्रसार कृती कार्यक्रमा’चा एक भाग म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने ‘व्यवसाय सुलभता’ संकल्पनेवर आधारित ‘उद्योग सुविधा कक्ष’ कार्यान्वित केला आहे.

कार्यक्रमात एमसीसीआयएचे माजी अध्यक्ष दिपक करंदीकर यांनी महापालिकेच्या या उपक्रमाचे सर्व उद्योजकांच्या वतीने स्वागत केले, आणि या उपक्रमास संपूर्ण सहकार्य देण्याचे आश्वासन दिले.




### उद्योजकांच्या समस्या सोडवण्यास मदत...

» याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले की, ‘ हा कक्ष कार्यान्वित केल्यामुळे महानगरपालिका व उद्योजक यांच्यातील संवाद वाढीस लागून उद्योजकांना भेडसावत असणारे प्रश्न सुटण्यास मदत होईल. ‘शासन आपल्या दारी’ या धर्तीवर एमसीसीआयएच्या भोसरी येथील कार्यालयात उद्योग सुविधा कक्षाचा एक हेल्पडेस्क कार्यान्वित करण्यात येईल. यामुळे बहुतेक उद्योजकांचा वेळ वाचेल व त्यांच्या समस्यांचे निराकरण वेळेत पूर्ण होईल.

### .... या सुविधा देणार!

» उद्योग सुविधा कक्षाच्या माध्यमातून संवाद सातत्य व उद्योग स्नेही धोरणांच्या आखणीवर भर देण्यात येणार आहे. महापालिका अधिकाऱ्यांच्या स्तरावर दरमहा एकदा आणि आयुक्त स्तरावर तीन महिन्यांतून एकदा बैठका घेऊन स्थानिक समस्यांचे निराकरण व धोरणात्मक निर्णय घेण्यात येतील. यासोबतच उद्योग क्षेत्राला कौशल्य विकास केंद्रामार्फत कुशल मनुष्यबळ पुरविण्यास मदत, कामगारांना सामाजिक सुविधा मिळण्यासाठी सहकार्य तसेच सीएसआर माध्यमातून उद्योगांना शहराच्या विकासासाठी प्रकल्प सुचविणे अशा अनेक सेवा या कक्षामार्फत देण्यात येणार आहेत.’

# विविधतेत एकता असलेला “एक भारत, श्रेष्ठ भारत” : राज्यपाल राजेंद्र अर्लेकर

## केंद्रीय पुणे नायर सर्व्हिस सोसायटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मळ्याळी नववर्षारंभा निमित्त स्नेह मेळाव्यात ते बोलत होते.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आपण शाळेत शिकताना एक प्रतिज्ञा घेतो कि सारे भारतीय माझे बंधू-भगिनी आहे. मग आपली संस्कृती वेशभूषा, प्रांत वेगळा असला तरीही सर्व भारतीयांना आपण बंधू भगिनी समान मानतो , कारण आपण कोणत्याही राज्यातील असलो तरी आपण एक आहोत. सर्वप्रथम भारतीय आहोत. विविधतेत एकता असलेला आपला देश आहे. एक भारत- श्रेष्ठ भारत आहे.असे उदगार केरळचे राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी काढले.केंद्रीय पुणे नायर सर्व्हिस सोसायटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मळ्याळी नववर्षारंभा निमित्त (विशु कुटैमा) स्नेह मेळाव्यात ते बोलत होते.



यावेळी खासदार श्रीरंग आप्पा बारणे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आ.उमा खापरे,आ. अमित गोरखे, मकरज्योतीग्रुप चे संचालक पीएसआर पिल्ले, आयोकी कंपनीचे संचालक गणेश कुमार,आयआयटी मुंबईचे एम एस उन्नीकृष्णन,के उन्नीकृष्णन, अध्यक्ष दिलीप नायर, सरचिटणीस मनोज पिल्ले,खजिनदार नंदकुमार एम.पी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी खासदार बारणे म्हणाले कि,पुणे स्थित मल्याळी बांधव आपली सण संस्कृती जपत आहे. आता तुम्ही केरळवासी नाही, तर पुणेवासी बनले आहात. आ. गोरखे म्हणाले कि, मल्याळी बांधवांनी मराठी माणसासोबत चांगले संबंध प्रस्थापित केले आहे.मल्याळी बांधव प्रेमळ, सकारात्मक,ऐक्य जपणारा समाज आहे.मी सीएमएसचा पहिला विद्यार्थी असल्याने मल्याळी बांधवां सोबत घट्ट संबंधत झाले आहे. आ. उमा खापरे यांनी काही समस्या असल्यास सांगावे. यावेळी भरतनाट्यम, विल्लूपाट्टू, नृत्य,असे दक्षिणात्य कला कृती सादर केली. यावेळी अध्यक्ष दिलीप नायर यांनी प्रास्ताविक केले. सरचिटणीस मनोज पिल्ले यांनी कार्य अहवाल सादर केला. सूत्रसंचालन विनिता नायर, दीप्ती नायर यांनी तर मनोज पिल्ले यांनी आभार मानले.

### केरळ राजभवनात महाराष्ट्र दिन होणार साजरा

» उकेरळमधील मराठी बांधवाना राजभावनात बोलवून त्यांच्या समवेत महाराष्ट्र दिन साजरा करणार आहे. तुम्ही पुण्यात राहून मराठी भाषा शिकला ही आनंदाची बाब आहे.तसेच केरळ मधील मराठी बांधवांना देखील मळ्याळी भाषा शिकण्याचा आग्रह करेन. मी बिहार चा राज्यपाल बनल्यानंतर दिल्लीत गेलो होतो. तेव्हा मी बिहारी पोशाखात दिल्लीला गेलो होतो. तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी, “आओ बिहारी बाबू” अशा शब्दात स्वागत केले होते.

# वारकऱ्यांना कोणतीही असुविधा होणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी

## श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर आषाढी वारी पालखी सोहळा नियोजनाबाबत आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी आषाढी वारी पालखी सोहळ्यासाठी पाणी, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, रस्ते, रस्ता सुरक्षा, आरोग्य सुविधा आदी सर्व सोयी सुविधा योग्य पद्धतीने उपलब्ध करून देण्यासह पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी सर्व यंत्रणांनी आतापासूनच नियोजन करावे. वारकऱ्यांना कोणतीही असुविधा होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिले.

श्री क्षेत्र देहू व श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर आषाढी वारी पालखी सोहळा नियोजनाबाबत आयोजित बैठकीत (दि. १६) जिल्हाधिकारी डूडी बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर महाराज मोरे आदी उपस्थित होते.



### समन्वय अधिकारी म्हणून प्रांताधिकाऱ्यांची नेमणूक

» यावेळी आळंदी येथील दर्शनबारीच्या अनुषंगाने जमीन आरक्षण, पालखी मार्गस्थ असताना वाहतूक कोंडी होऊ नये, स्वागतासाठी लावण्यात येणारे ध्वनीक्षेपक, ध्वनीवर्धक, पालखी मार्गस्थ असताना तसेच पाण्याचे टँकर भरण्याच्या ठिकाणी अखंड वीजपुरवठा, भारतीय राष्ट्रीय रस्ते प्राधिकरणाने पालखी महामार्गाची अपूर्ण कामे करून घेणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारक्षेत्रातील रस्त्यांची डागडुजी आदींच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. पालखी सोहळ्यात कोणत्याही घटनेच्या अनुषंगाने संपर्क साधण्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून प्रांताधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येईल, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या.

### ई-टॉयलेट्सचे होणार संनियंत्रण

» यावर्षी वारी सोहळ्यात मोठ्या प्रमाणात फिरती ई- टॉयलेट्स ठेवण्यात येणार आहेत. त्यांची स्वच्छता, तेथे पाण्याचा पुरवठा होत आहे किंवा कसे आदी संनियंत्रण करण्याची वेगळी व्यवस्था व पथक नेमण्यात येणार आहे. त्याचे एक मोबाईल ॲप तयार करण्यात येणार असून ही मोबाईल स्वच्छतागृहे ठेवण्यात आलेल्या ठिकाणी क्यू आर कोड लावण्यात येणार आहेत. ज्यावरुन अस्वच्छ स्वच्छतागृहांची छायाचित्रे काढून अपलोड करता येतील. ते प्रशासनास प्राप्त होतील व त्यानुसार स्वच्छतेबाबत नियोजन तात्काळ करणे शक्य होणार आहे. वेगवान मोबाईल नेटवर्कसाठी बूस्टर लावण्यात येतील, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

### सर्व सुविधा गतवर्षीपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येतील

» पालखी सोहळा नियोजनाच्या अनुषंगाने यंत्रणांना तयारी करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा यासाठी ही बैठक लवकर आयोजित करण्यात आल्याचे सांगून जिल्हाधिकारी डूडी म्हणाले, श्री क्षेत्र आळंदी तसेच श्री क्षेत्र देहू संस्थानच्यावतीने करण्यात येणाऱ्या सूचनांवर सकारात्मक चर्चा करून तोडगा काढण्यात येईल. बैठकीदरम्यान दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाहीचा अहवाल संबंधित यंत्रणांनी मे महिन्यातील पुढील बैठकीत सादर करावा. आरोग्य सुविधा, शौचालये, पाणीपुरवठा आदी सर्व सुविधा गतवर्षीपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येतील, अशी ग्वाही जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली.

बैठकीस जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त विक्रमसिंह मोरे, वैभव मोरे, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान समितीचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा प्रमुख योगी निरंजन नाथ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाप्पा बहीर, पुणे शहरच्या प्रांताधिकारी स्नेहा किसवे-देवकाते, खेड प्रांताधिकारी अनिल दौंडे, हवेलीचे प्रांताधिकारी यशवंत माने, दौंड प्रांताधिकारी मिनाज मुल्ला, पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, वारकरी महामंडळ उपाध्यक्ष डी. डी. भोसले पाटील, संबंधित तालुक्यांचे तहसीलदार, महानगरपालिका, नगरपरिषद, आरोग्य विभाग, पोलीस, एनडीआरएफ, अग्निशमन विभाग, पशुसंवर्धन विभाग, परिवहन विभाग, राज्य मार्ग परिवहन महामंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# गुणवत्तापूर्ण काम करणाऱ्या शाळा, शिक्षकांना आता आयडॉल दर्जा

## राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळांची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यभरातील गुणवत्तापूर्ण अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळांची निवड करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याशिवाय, आयडॉल शाळांची बँक करण्यात येणार असून, आयडॉल शिक्षक आणि शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेतले जाणार आहे.

शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे शिक्षक आणि शाळांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या अनुभवाचा उपयोग विद्यार्थी आणि पालकांना करून देण्यासाठी आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा ही संकल्पना हाती घेण्यात आली आहे. या अंतर्गत निवड करण्यासाठी शाळांमधील विविध उपक्रम, नवीन अध्ययन पद्धती, शासकीय ध्येय-धोरणांची अंमलबजावणी, मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळामधील भूमिका अशा निकषांच्या आधारे आयडॉल शिक्षक आणि आयडॉल शाळा यांची निवड केली जाणार आहे. शिक्षकांची आचारविचाराची पद्धत, विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती, शिष्यवृत्ती, कला, क्रीडा, सांस्कृतिक, उच्च शिक्षणातील सहभाग अशा निकषांवर समितीने शिक्षक आणि शाळांचे मूल्यमापन करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

आयडॉल शिक्षक, शाळांना शिक्षण विभागाच्या कामकाजात सहभागी करून घेण्याचेही नियोजन आहे. त्यानुसार राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद व अन्य संस्थांनी आयडॉल शिक्षकांना 'मास्टर ट्रेनर' म्हणून घ्यावे, आयडॉल शाळांना भेटीचे नियोजन करावे, या शाळांमधील शिक्षकांना आणि अन्य सक्रिय सदस्यांना पालिकांच्या शाळांमध्ये अध्यापन मार्गदर्शक म्हणून घ्यावे, आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा यांच्या कामाचे चित्रीकरण, कागदपत्रे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांनी वेळोवेळी करावे, त्यांच्या कामाचा प्रचार करावा, आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा यांचे गट संमेलन, परिषदांमध्ये उद्बोधन ठेवणे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.



### तीन स्तरीय समितीची नियुक्ती

» आयडॉल शिक्षक, आयडॉल शाळा उपक्रमासाठी तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरावर समिती नियुक्त करण्यात आली आहे. तालुकास्तरावरील समितीत गटशिक्षणाधिकारी, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता, शिक्षणतज्ज्ञ, दोन केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी असतील. जिल्हा स्तरीय समितीत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, दोन शिक्षणतज्ज्ञ हे सदस्य म्हणून आणि ज्येष्ठ अधिव्याख्याता यांचा समावेश असेल. राज्यस्तरीय समितीत शिक्षण आयुक्त हे समिती प्रमुख, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, दोन शिक्षणतज्ज्ञ, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे सहसंचालक, उपसंचालक यांचा समावेश असेल.


# पर्यावरणप्रेमींकडून पंतप्रधानांना पोस्टकार्ड

## नदीसुधार प्रकल्पाच्या विरोधात पिंपरी-चिंचवडकर एकवटले; जैवविविधता, प्राणी-पक्ष्यांचा अधिवास नष्ट होण्याची भीती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुण्यामधील मुठा नदीपात्र विकसित करण्यापाठोपाठ आता मुळा, पवना आणि इंद्रायणी या नद्यांच्या सुधारणेसाठी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी नदीकाठावर वृक्षतोड, राडारोडा टाकून भराव करणे, अशी कामे सुरू करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे नद्यांच्या काठावरील पक्षी आणि प्राण्यांचा अधिवास नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जाऊ लागली आहे.

या सोबतच जलचरांचा अधिवासही धोक्यात आला आहे. पिंपरी-चिंचवडमधील प्रकल्पासाठी तब्बल २ हजार ७०० कोटींचा खर्च अपेक्षित असून, या मधील केवळ ५ टक्के रक्कम नदीच्या स्वच्छतेसाठी वापरली जाणार आहे. उर्वरित ९५ टक्के रक्कम किनारे सजवण्यावर खर्च केली जाणार आहे. या प्रकल्पाविरोधात पर्यावरणप्रेमी एकवटले असून, पंतप्रधानांना पोस्ट कार्ड पाठवून प्रकल्प थांबवण्याची मागणी केली जाणार आहे. अन्यथा, जलसमाधी घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.



### पालिका आयुक्तांसोबतच्या बैठकीत दिला ईशारा

» नदी पुनरुज्जीवन समिती आणि महापालिका प्रशासन यांच्यामध्ये बैठक झाली. त्यामध्ये कोणताही तोडगा निघाला नाही. प्रशासन हा प्रकल्प राबवण्याच्या भूमिकेवर ठाम आहे. तर, समिती प्रकल्पाला विरोध करण्यावर ठाम आहे. समितीने सुचवलेल्या काही सूचना योग्य असून, त्या आम्ही निश्चित अमलात आणू, असे आश्वासन आयुक्तांनी दिले असले तरी आमच्या पदरी निराशा पडल्याचे समिती सदस्यांनी सांगितले.

भविष्यातील संभाव्य पूरस्थिती, नदी प्रदूषण, वन्य प्राणी-पक्ष्यांचा अधिवास, जैवविविधता नष्ट होण्याचा धोका वर्तवला जात आहे. हा केंद्र सरकारचा प्रकल्प आहे. नदीसुधार प्रकल्पामुळे होणाऱ्या दुष्परिणामांकडे लक्ष वेधण्यासाठी पर्यावरणप्रेमी आणि पिंपरी-चिंचवड महापालिका नदी पुनरुज्जीवन समितीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांना हा प्रकल्प तत्काळ थांबवण्यासाठी विनंती करण्यात आली. त्यानंतर पिंपरी-चिंचवडचे आयुक्त शेखर सिंह यांच्याबरोबर बैठकसुद्धा झाली. मात्र, आयुक्तांनी हा प्रकल्प होणारच, अशी भूमिका घेतल्याने आता थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पोस्टकार्ड पाठवून लोकभावना कळवण्यासाठी मोहीम हाती घेण्यात आली आहे. या सोबतच वेगवेगळ्या सामाजिक संस्थासुद्धा (एनजीओ) या लोकचळवळीत सहभागी झाल्या आहेत. नदीसुधार प्रकल्पाच्या माध्यमातून नदी आणखी प्रदूषित होईल. प्रशासन आपल्या भूमिकेवर ठाम असल्यामुळे समितीच्या वतीने जलसमाधी आंदोलन करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे.

मुळा, पवना आणि इंद्रायणी नदीसुधार प्रकल्पांतर्गत नदीचे पात्र आकसणार आहे. ‘आम्हाला नदीचे शुद्धीकरण व्हायला हवे आहे. सुशोभीकरण नको’, असा पवित्रा समितीने घेतला आहे. नद्यांच्या उगमापासून संगमापर्यंत नदीचे पात्र स्वच्छ करा. नदी पात्रातील अतिक्रमण कमी करा. नदीमध्ये सोडले जाणारे प्रदूषित पाणी बंद करा, अशा मागण्या मुख्यमंत्री फडणवीस आणि पालिका आयुक्तांकडे करण्यात आल्या आहेत.

> नदी प्रदूषण अनेक वर्षांपासून होते आहे. नदीसुधार प्रकल्पांतर्गत पालिका प्रशासनाने वृक्षतोड सुरू केली आहे. प्रदूषित पाणी नदीत सोडले जात आहे. या प्रकल्पाच्या नावाखाली नदीमध्ये कॉंक्रिटीकरण केले जाणार असून, पात्र आणखी अरुंद होणार आहे. प्रकल्पांतर्गत नदी स्वच्छतेसाठी एकूण खर्चाच्या फक्त पाच टक्केच खर्च केला जाणार आहे. अन्य खर्च हा नदीकाठ सुशोभीकरणावर होणार आहे. पुराचा धोका वाढणार आहे. हा प्रकल्प नेमका कोणाच्या फायद्यासाठी केला जात आहे, हे प्रशासनाने जाहीर करावे.
>
> **- बाबा भोईर, पिंपरी-चिंचवड महापालिका नदी पुनरुज्जीवन समिती**

> नदीचे विद्रूपीकरण करण्याचा घाट घातला जात आहे. स्वच्छतेपेक्षा नदीकाठ सुशोभीकरणावर अधिक भर देण्यात आला आहे. पालिका प्रशासनाकडे आम्ही पोटतिडकीने पर्यावरणप्रेमींची बाजू मांडत आहोत. मात्र, अधिकारी आम्ही प्रकल्प राबवणारच आहे, अशी भूमिका घेत आहेत. त्यामुळे आम्हीदेखील आमच्या भूमिकेवर ठाम आहोत.
>
> **- शुभम पांडे, वन्य प्राणीप्रेमी व पर्यावरणप्रेमी**

# धनंजय मुडेंना मुख्यमंत्र्यांचे पाठबळ, मनोज जरांगे-पाटील यांचा आरोप

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडे यांना वाचविले, असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केला.

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळीतील कार्यालयात खंडणी आणि संतोष देशमुख यांच्या खुनाचे नियोजन झाले. मात्र, मुंडे यांना सहआरोपी करण्यात आले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंडे यांना वाचविले,’ असा आरोप मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी शनिवारी केला.

‘संतांची भूमी असलेला बीड जिल्हा बदनाम झाला आहे. राजकीय स्वार्थासाठी गुंड टोळ्यांच्या माध्यमातून खून केले जात आहेत. सत्तेतून पैसा, संपत्ती कमावणे, त्यामुळे बीड जिल्ह्यात नागरिकांना त्रास झाला आहे.



हे थांबविण्यासाठी समाजाने खोट्याला खोटे म्हटले पाहिजे. शासनाने खोट्याची पाठराखण करू नये, अशी अपेक्षा होती. संतोष देशमुख हत्या प्रकरणात राजकीय पाठबळामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी मुंडे यांना वाचवले आहे. त्यामुळे सहआरोपी करण्याची मागणी करणे बंद करावे लागले आहे,’ असे जरांगे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

पुढे ते म्हणाले, धनंजय मुंडे यांना बीडचा बिहार करायचा आहे. पण, आम्ही तो होऊ देणार नाहीत. ‘त्या’ मंत्र्याने बीडला बदनाम केलं आहे. आरोग्य अधिकारी अशोक थोरात यांचं निलंबन का केलं? ते मराठा असल्याने त्यांचं निलंबन केलं आहे का?. १२ जणांची चौकशी झाली मग अशोक थोरात यांचंच निलंबन केलं. अजित पवारांनी सगळ्यांना निलंबित करायला हवं. सर्वच जण दोषी आहेत. सगळ्यांना कारागृहात पाठवा. अनेकांच्या क्रूर हत्या त्या नेत्याने केल्या आहेत. समाजाची बदनामी झाल्याने अनेकजण नाराज आहेत.

वाल्मीक कराडचा एन्काउंटर करण्याची सुपारी धनंजय मुंडे यांनी दिली होती, असा दावा बीडचे निलंबित पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले यांनी केला आहे. त्याबाबत जरांगे म्हणाले, ‘तपासात सत्य पुढे येईल. त्याबाबतची सविस्तर माहिती नाही. वाल्मीक कराडचा २० वर्षे वापर केला. अनेकांच्या हत्या केल्या, पैसे कमविले, आता मारून टाकावे, असे धनंजय मुंडे यांना वाटले असेल. जे काही आहे, ते तपासात निष्पन्न होईल.’

> कुणबी नोंद सापडलेल्या लोकांना अधिकारी जाणीवपूर्वक प्रमाणपत्रे देत नाहीत. अशा अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याची मागणी केली जाणार आहे. अधिकाऱ्यांच्या पाठीमागे कोणतीही राजकीय शक्ती असली, तरी त्यांना घरी बसविल्याशिवाय शांत बसणार नाही.
>
> **- मनोज जरांगे-पाटील**

# काँग्रेसला धक्का, संग्राम थोपटेंची पक्षाला सोडचिठ्ठी; भाजपात प्रवेश करणार

## संग्राम थोपटे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आपल्यावर काँग्रेस पक्षानेच काँग्रेस सोडण्याची वेळ आणली असल्याचंही म्हटलं आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेसचे नेते तथा भोर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संग्राम थोपटे यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतला आहे. संग्राम थोपटे यांनी काँग्रेसच्या प्राथमिक सभासदत्वाचा राजीनामा दिला आहे. तसेच आज (२० एप्रिल) कार्यकर्त्यांबरोबर बैठक घेऊन थोपटे यांनी आपली पुढील भूमिका स्पष्ट केली आहे. संग्राम थोपटे हे येत्या २२ एप्रिल रोजी भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहेत, अशी माहिती त्यांनी स्वतः पत्रकार परिषदेत दिली आहे.

काही दिवसांपूर्वी माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यानंतर आता संग्राम थोपटे हे देखील काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देणार असल्यामुळे राज्यात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, संग्राम थोपटे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना आपल्यावर काँग्रेस पक्षानेच काँग्रेस सोडण्याची वेळ आणली असल्याचंही म्हटलं आहे. तसेच आपल्याला अनेकदा डावलण्यात आल्याचा आरोपही यावेळी संग्राम थोपटे यांनी पक्षावर केला.



### कोणत्या पक्षात प्रवेश करणार?

» "देशात किंवा राज्यात भाजपाचं सरकार सत्तेत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांचं मत आहे की आपल्या मतदारसंघात विकास कामांना जर गती द्यायची असेल तर भारतीय जनता पक्षात प्रवेश केला पाहिजे, अशी कार्यकर्त्यांची भूमिका आहे. आता माझी वैयक्तिक भूमिका मी आधीच सांगितलं होतं की कार्यकर्त्यांशी संवाद साधल्यानंतर ठरवेन. आता कार्यकर्त्यांचं मत आहे की मी भारतीय जनता पक्षाची राजकीय भूमिका घेतली पाहिजे. तेथेच आपल्याला न्याय मिळेल", असंही संग्राम थोपटे यांनी म्हटलं.

**'काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली...'**

"मला काँग्रेसकडून कुठेही थांबवण्याचा प्रयत्न झाला नाही. खरं तर मला काँग्रेस सोडण्याची वेळ काँग्रेसनेच आणली. २००९ साली मी पहिल्यांदा या मतदारसंघातून निवडून आलो. पक्षाने मला उमेदवारी दिली आणि मी निवडून आलो. तेव्हा मी नवीन होतो. त्यानंतर २०१४ ला मी पुन्हा निवडून आलो. त्यानंतर २०१९ साली पुन्हा निवडून आलो. तेव्हा महाविकास आघाडीचं सरकार सत्तेत आलं. तेव्हा काँग्रेसला १२ मंत्रिपदे मिळाली होती. मला संधी मिळेल अशी भावना होती. पण तेव्हा मला संधी मिळाली नाही", असंही ते म्हणाले.

"त्यानंतर नाना पटोले यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. तेव्हा मला वाटलं होतं की मला संधी मिळेल. पण तेव्हाही मला संधी मिळाली नाही. त्यानंतर महाविकास आघाडीचं सरकार सत्तेतून गेल्यानंतर विरोधीपक्ष नेतेपदाची संधी मिळेल अशी अपेक्षा होती, पण तेव्हाही संधी मिळाली नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांची भावना आता अशी झाली आहे की पुण्यासारख्या जिल्ह्यात देखील तुम्ही तीनवेळा निवडून आलात तरी देखील तुम्हाला संधी मिळाली नाही. त्यामुळे पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला पाहिजे अशी भावना कार्यकर्त्यांशी झाली. त्यामुळे हा निर्णय घेतला आहे", असं संग्राम थोपटे यांनी सांगितलं आहे.

### संग्राम थोपटे काय म्हणाले?

» "आमच्या कार्यकर्त्यांचं म्हणणं आहे की तुम्ही अनेक वर्ष काँग्रेसचं काम करत आहात. मात्र, प्रामाणिकपणे काम करत असतानाही पक्षाने तुम्हाला कायम डावलण्याचं काम केलं. शेवटी तुम्हाला मतदारसंघात जनतेनी तीन वेळा संधी दिली. मतदारसंघात तुम्ही विकासाची कामे केली. पण मतदारसंघात अजून विकासाच्या कामांना गती द्यायची असेल तर आपल्याला दुसऱ्या पक्षात जावं लागेल. त्यामुळे अशा पद्धतीचा निर्णय आज झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेतला आहे", असं संग्राम थोपटे यांनी म्हटलं आहे.

### भाजपात पक्ष प्रवेश कधी?

» "येणाऱ्या २२ एप्रिल रोजी भाजपात पक्ष प्रवेश होईल. या पक्ष प्रवेशाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत मुंबईत पक्ष प्रवेश होणार आहे. माझ्याबरोबर अनेक कार्यकर्ते भाजपात प्रवेश करणार आहेत", अशी माहिती संग्राम थोपटे यांनी दिली.

# जलजीवनचे कोट्यवधी रुपयांचे पाईप धूळखात

## योजना प्रत्यक्षात येईना, लोकांची तहान भागेना : ऐन उन्हाळ्यात पाण्यासाठी हाल

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्र सरकारने प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा होण्यासाठी जलजीवन मिशन योजनेची अंमलबजावणी सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील नागरिकांना स्वच्छ आणि शुद्ध पाणी उपलब्ध करून देणे आहे. ज्यामुळे महिलांचे पाणी आणण्याचे कष्ट कमी होऊन त्यांचा वेळ आणि श्रम वाचले आहेत. पूर्व हवेलीत सुद्धा अनेक गावात या मिशन योजनेअंतर्गत जलजीवनचे काम चालू झाले; परंतु याला गती कमी आल्यामुळे करोडो रुपयांचे पाइप अस्ताव्यस्त व धूळखात पडल्याचे दिसत आहे.



सोरतापवाडी, उरुळी कांचन, कोरेगाव मूळ, आळंदी म्हातोबाची, कदमवाकवस्ती या गावातील जीवन मिशन योजना परवानगी मिळाल्यापासून कायम वादाच्या भोवऱ्यात आहेत.कधी जागेबद्दल वाद, तर कधी रस्त्याबद्दल तक्रारी येतच आहेत. काही ठिकाणी पिण्याच्या पाण्याची पाइपलाइन तोडल्यामुळे पाणी पुरवठा बंद होता. तर काही ठिकाणी गावातील रस्ते उकरून ठेवल्यामुळे नागरिकांना त्याचा खुपच त्रास सहन करावा लागत आहे. कोरेगाव मूळ व उरुळी कांचन येथील लाखो रुपयांचा मुरूम व माती परस्पर विकून शासनाचा लाखोंचा महसूल बुडविल्याचा आरोप झाला.

कोरेगाव मुळ येथील पाणी पुरवठा योजना 88 कोटी 12 लाख 86 हजार रुपये, उरुळी कांचन येथील पाणी पुरवठा योजना जवळपास 90 कोटी, सोरतापवाडी येथील योजना 65 कोटी, कदमवाकवस्ती येथील योजना 89 कोटी 97 लाख रुपयांची. इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास व आराखड्यास जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत शासकीय मान्यता देण्यात आली होती. पण प्रारंभ झाल्यापासून सतत नवीन नवीन वाद पुढे येत असुन सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्यात रस्त्यावरून वाद चालू झाला. विनापरवानगी अनधिकृतपणे रस्ता खोदून नुकसान केले. रस्ते पुन्हा दुरुस्त करून दिले नाही. याबाबत चौकशी करून ठेकेदारावर विनापरवानगी आणि अधिकृतपणे शासकीय मालमत्तेचे नुकसान केलेबाबत गुन्हा दाखल करावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पूर्व हवेलीत या योजनेअंतर्गत येणारे कोट्यवधी रुपयांचे पाइप अस्ताव्यस्त पडले असून याला कोणी वाली नसल्यासारखेच झाले आहे. वरील गावातील योजना मध्यंतरी निधीअभावी बंद होत्या. पण आता त्या हळूहळू सुरु झाल्या आहेत. या मिशन अंतर्गत येणाऱ्या योजना पूर्ण झाल्यावर केंद्र सरकारची एक चांगली योजना नागरिकांना पहावयास मिळेल व नागरिकांची पाण्याच्या त्रासापासून नक्कीच सुटका होईल.

> सर्व ठेकेदारांना योजना ताबडतोब पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. काही परवानग्या रखडल्या होत्या. आता त्या बऱ्यापैकी मिळाल्या आहेत. तसेच निधीची कमतरता पण होती पण आता निधीचा प्रश्न सुद्धा सुटलेला असून साठवण तलावाचे काम जोरात चालू आहे. जून व जुलै महिन्यात वरील गावातील जलजीवन मिशनचे काम 70 ते 80 टक्के पूर्ण होऊन पाणी सोडण्यास सुरुवात होणार आहे. तसेच ठेवलेल्या पाईपामुळे नागरिकांना त्रास होणार नसल्याची काळजी ठेकेदारांना घेण्यास सांगितले आहे.
>
> **- इक्लास शेख, उपअभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**